देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे

न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, (स्वायत्त) देवरुख, जिल्हा- रत्नागिरी

# "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम अहवाल

## ०१ – १५ जानेवारी २०२५












डॉ. नरेंद्र प. तेंडोलकर
प्राचार्य , एम स्सी. पीएच.डी.

दिनांक : ३१.०१.२०२५
जावक क्र. ASP/LIB/२०२४-२५ / १७

# "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम अहवाल

## (०१ -१५ जानेवारी, २०२५)



# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ४-५ |
| २. | उपक्रम समिती | ६ |
| ३. | उपक्रमाचे नियोजन पत्रिका | ७-१० |
| ४. | उपक्रम- ०१ : वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे उद्घाटन व वाचन संस्कृती व पुस्तकांची निवड व्याख्यान – डॉ. अरविंद कुलकर्णी | ११-१२ |
| ५. | उपक्रम- ०२ : ०१ तासाचे सामुहिक वाचन | १३-१५ |
| ६. | उपक्रम- ०३ : ग्रंथ व दिवाळी विशेषांक प्रदर्शन | १५-१७ |
| ७. | उपक्रम- ०४ : संगमेश्वर तालुका प्राथमिक शिक्षक संमेलन व ग्रंथालय भेट | १७-१९ |
| ८. | उपक्रम- ०५ : ग्रंथालय भेट  व परिचय – सद गुरू लोकमान्य वाचनालय, देवरुख | १९-२१ |
| ९. | उपक्रम- ०६ : ग्रंथदिंडी | २१-२४ |
| १०. | उपक्रम- ०७ : लेखक आपल्या भेटीला अंतर्गत "नादिष्ट" कादंबरीचे लेखक श्री. मनोज बोरगावकर यांची मुलाखत | २४-२७ |
| ११. | उपक्रम- ०८ : 'ज्ञान द्या, संधी द्या' अंतर्गत गोकुळ अनाथाश्रम, मातृमंदिर देवरुख मुलींना ग्रंथ भेट व वाचन आवड संवाद | २८-२९ |
| १२. | उपक्रम- ०९ : 'पुस्तक आपल्या दारी' अंतर्गत हातीव गावामध्ये ग्रंथ प्रदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट | २९-३० |
| १३. | उपक्रम- १० : 'पुस्तक आपल्या दारी' अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – पोलीस स्टेशन, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन | ३१-३३ |
| १४. | उपक्रम- ११ : 'पुस्तक आपल्या दारी' अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – तहसीलदार कार्यालय, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन | ३४-३६ |

| | | |
|---|---|---|
| १५. | उपक्रम- १२ : ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – नगरपंचायत कार्यालय, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन | ३६-३९ |
| १६. | उपक्रम- १३ : ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत पाटगाव गावामध्ये ग्रंथ प्रदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट | ४०-४१ |
| १७. | उपक्रम- १४ : व्याख्यान : कोकणचे बुद्धिवैभव – श्री. प्रकाश देशपांडे, लो. टिळक स्मारक वाचन मंदिर, चिपळूण | ४१-४३ |
| १८. | उपक्रम- १५ : कार्यशाळा: संवाद कौशल्य कार्यशाळा डॉ. वंदना बोकिल- कुलकर्णी | ४४-४६ |
| १९. | उपक्रम- १६ : पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा | ४६-५१ |
| २० | उपक्रम- १७ : व्याख्यान: विवेकानंद विचार आणि कार्ये- श्री. संदीप मुळ्ये | ५२-५४ |
| २१. | उपक्रम- १८ : कार्यशाळा: अनुवाद -कौशल्य व करिअर संधी कार्यशाळा- सौ. विष्णुप्रिया व्ही. आठल्ये | ५४-५६ |
| २२. | राष्ट्रीय छात्र सेना (NCC) नेव्ही व आर्मी दोन्ही युनिटमधील विद्यार्थ्यांना “राज्यघटना आणि नागरिक” हे राजेंद्रप्रसाद स. मसुरकर लिखित पुस्तक, मान्यवरांच्या हस्ते प्रदान | ५७ |
| २३. | विविध वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या उपक्रमांच्या बातम्या | ५८-७३ |

# प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाच्या आठल्ये-सप्रे-पित्रे महाविद्यालयात नववर्षाच्या प्रारंभी करण्यात आला. वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करीत तरुणांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला गती देणे आणि समाज प्रबोधन करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हा उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशेष समिती स्थापन करण्यात आली. समितीने १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध वाचनप्रिय उपक्रमांचे सविस्तर नियोजन करून त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली.

१ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत राबविण्यात आलेल्या वाचन पंधरवड्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची सुरुवात वरिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित सामूहिक वाचन सत्र आणि "वाचन संस्कृती व पुस्तक निवड" या कार्यशाळेने झाली. कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक डॉ. अरविंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्त्व आणि योग्य पुस्तक निवडीसंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी शुभेच्छापर भाषणात वाचनाच्या सवयीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी वाचनामुळे वैयक्तिक विकास कसा साधता येतो आणि त्याचा समाजावर कसा सकारात्मक प्रभाव पडतो, याचे मार्मिक विवेचन केले. उप-प्राचार्य डॉ. सरदार पाटील यांनी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमाची उद्दिष्टे स्पष्ट करत, उपक्रमाच्या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.

## वाचन पंधरवड्यातील महत्त्वाचे उपक्रम:

या वाचन पंधरवड्यात सामूहिक वाचन सत्र, वाचन संस्कृती व पुस्तक निवड कार्यशाळा,

वाचन कौशल्य कार्यशाळा, ग्रंथालय भेट, पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा, वाचन संवाद कौशल्य कार्यशाळा, अनुवाद कौशल्य व करिअर संधी, कोकणचे बुद्धिवैभव, तसेच "लेखक आपल्या भेटीला" या अंतर्गत नामांकित लेखकांच्या मुलाखतींचा समावेश होता. "पुस्तके आपल्या दारी" या संकल्पनेतर्गत गावागावांत पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. स्थानिक तहसीलदार कार्यालये, पोलीस स्थानके आणि नगरपंचायतींमध्ये वाचनासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. गोकुळ अनाथाश्रमातील विद्यार्थिनींना पुस्तक भेट देऊन वाचन संवाद साधण्याचा उपक्रमही राबविण्यात आला.

## उपक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान:

या उपक्रमाच्या नियोजनासाठी आणि अंमलबजावणीसाठी उप-प्राचार्य डॉ. सरदार पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. वर्षा फाटक, ग्रंथपाल प्रा. सुभाष मायंगडे, हिंदी विभाग प्रमुख प्रा. स्नेहलता पुजारी, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. स्वप्ना पुरोहित, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. सुनिल सोनावणे व त्यांच्या संपूर्ण टीमचे, मराठीचे प्रा. अजित जाधव, तसेच ग्रंथालय कर्मचारी स्वप्नील कांगणे व रोशन गोरुले यांचे विशेष योगदान लाभले आहे.

## मुख्य हेतू:

या वाचन पंधरवड्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे, त्यांना वाचन संस्कृतीशी जोडणे आणि वाचनाच्या माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास साधणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम वाचन संस्कृतीला पुन्हा एका नव्या उंचीवर नेणारा उपक्रम ठरला आहे.

# “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” उपक्रम समिती:

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे
न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, देवरुख, (स्वायत्त) ,जिल्हा- रत्नागिरी-४१५ ८०४
नॅक पुनर्मुल्याकन ३ रे – 'अ' श्रेणी   मुंबई विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार- २००९- २०१०

३० डिसेंबर २०२४

## सूचना

## “वाचन संकल्प महाराष्ट्राचा” उपक्रम समिती

### (०१ जानेवारी- १५ जानेवारी २०२५)

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २० डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकानुसार, वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्यात यावा याकरिता पुढील समितीची रचना करण्यात येत आहे. सदर उपक्रमांतर्गत दरवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवडा राबविण्यात यावा. सदर उपक्रम राबविण्यासाठी परिपत्रकात सूचित केलेल्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

समितीची रचना पुढीलप्रमाणे:

| अ. क्र. | समितीतील सदस्यांचे नावे | पद |
|---|---|---|
| १. | डॉ. नरेंद्र प. तेंडोलकर (प्राचार्य) | अध्यक्ष |
| २. | डॉ. सरदार आ. पाटील (उप-प्रचार्य) | प्राचार्य नामनिर्देशित समन्वयक |
| ३. | श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) | सदस्य |
| ४. | प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख ) | सदस्य |
| ५. | प्रा. स्नेहलता एस. पुजारी (हिंदी विभाग प्रमुख) | सदस्य |
| ६. | प्रा. स्वप्ना नितीन पूरोहित (इंग्रजी विभाग प्रमुख) | सदस्य |
| ७. | प्रा. सुनील रत्नाकर सोनवणे (राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख ) | सदस्य |
| ८. | प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग) | सदस्य |

**सदर समितीची जबाबदारी वाचन उपक्रमातील विविध कार्ये नियोजित व यशस्वीरीत्या पूर्ण करण्याची असेल.**

SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH NYA ATHLYE, VED.

प्राचार्य

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे,
न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, देवरुख, (स्वायत्त) ,जिल्हा- रत्नागिरी-४१५ ८०४
नॅक पुंनर्मूल्यांकन ३ रे – 'अ' श्रेणी मुंबई विद्यापीठ उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार- २००९- २०१०

## "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम

## (०१ जानेवारी- १५ जानेवारी २०२५)

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २० डिसेंबर २०२४ च्या परिपत्रकानुसार, वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात यावा याकरिता पुढीलप्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाची जबाबदारी ज्या प्राध्यापकांना दिली आहे त्यांनी त्या त्या कार्यक्रमाचे फोटो (जिओटॅग) व संक्षिप्त अहवाल ग्रंथपाल श्री. सुभाष एस. मायंगडे यांच्याकडे त्याच दिवशी सुपूर्द करावा.

| अ. क्र. | तारीख | उपक्रम/ कार्यक्रमाचे नाव | जबाबदारी |
|---|---|---|---|
| १. | ०१/०१/२०२५ बुधवार | **वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा उद् घाटन** - मा. प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांच्या हस्ते | **डॉ. सरदार आ. पाटील (उप-प्राचार्य )** |
| २. | ०१/०१/२०२५ बुधवार | **वाचन संस्कृती आणि पुस्तकांची निवड** वक्ते: डॉ. अरविंद कुलकर्णी | **डॉ. सरदार आ. पाटील (उप-प्राचार्य )** प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख) प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख ) |
| ३. | ०१/०१/२०२५ बुधवार | **०१ तासाचे सामूहिक वाचन उपक्रम** | **श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)** |
| ४. | ०२ /०१/२०२४ गुरुवार | **निवडक ग्रंथ व दिवाळी विशेष अंकांचे प्रदर्शन** | **श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)** प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग) प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख ) |
| ५. | ०२ /०१/२०२४ गुरुवार | **संगमेश्वर तालुका प्राथमिक शिक्षक संमेलन व ग्रंथालय भेट आयोजन** | **श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)** प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख) प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग) |
| ६. | ०३ /०१/२०२४ शुक्रवार | **ग्रंथालय भेट व परिचय (सद् गुरु लोकमान्य वाचनालय, देवरुख)** देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. सदानंदजी भागवत व अन्य मान्यवर यांची विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थिती.. क्रांतीज्योती | **प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख)** श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग) प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन | |
| ७. | ०४/०१/२०२४<br>शनिवार | **ग्रंथ दिंडी** | **प्रा. सुनिल रत्नाकर सोनावणे**<br>**(राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख )**<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)<br>प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग) |
| ८. | ०६/०१/२०२५<br>सोमवार | **लेखक आपल्या भेटीला अंतर्गत 'नदीष्ट' कादंबरीचे लेखक श्री. मनोज बोरगावकर यांची मुलाखत** | **प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक**<br>**(मराठी विभाग प्रमुख)**<br>प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख )<br>प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग)<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) |
| ९. | ०७/०१/२०२५<br>मंगळवार | **"ज्ञान द्या, संधी द्या अंतर्गत - गोकुळ अनाथाश्रम, मातृमंदिर देवरुख मुलींना ग्रंथ भेट व वाचन आवड संवाद** | **प्रा. स्नेहलता एस. पुजारी**<br>**(हिंदी विभाग प्रमुख )**<br>प्रा. स्वप्ना नितीन पूरोहित (इंग्रजी विभाग प्रमुख) |
| १० | ०८/०१/२०२५<br>बुधवार | **'पुस्तक आपल्या दारी' –**<br>गावाचे नाव -हातीव | **प्रा. सुनिल रत्नाकर सोनावणे**<br>**(राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख ) व राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थी प्रतिनिधी**<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) |
| ११. | ०८/०१/२०२५<br>बुधवार | **'पुस्तक आपल्या दारी'- प्रशासकीय आस्थापना - पोलीस स्टेशन, देवरुख** | **डॉ. सरदार आ. पाटील (उप-प्राचार्य )**<br>प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख)<br>प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख )<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) |
| १२. | ०९/०१/२०२५<br>गुरुवार | **'पुस्तक आपल्या दारी' –**<br>गावाचे नाव -पाटगाव | **प्रा. सुनिल रत्नाकर सोनावणे**<br>**(राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख ) व राष्ट्रीय सेवा योजना विभाग विद्यार्थी प्रतिनिधी**<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) |
| १३. | ०९/०१/२०२५<br>गुरुवार | **'पुस्तक आपल्या दारी'- प्रशासकीय अस्थापना – तहसीलदार कार्यालय, व नगरपंचायत, देवरुख** | **डॉ. सरदार आ. पाटील (उप- प्राचार्य )**<br>प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक (मराठी विभाग प्रमुख)<br>प्रा. स्नेहलता पुजारी (हिंदी विभाग प्रमुख )<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल) |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | १०/०१/२०२५<br>शुक्रवार | ऑनलाइन व्याख्यान- वाचन संस्कृती- मिलिंद जोशी | प्रा. डॉ. वर्षा एस. फाटक<br>(मराठी विभाग प्रमुख) |
| १५. | ११/०१/२०२५<br>शनिवार | संवाद कौशल्य कार्यशाळा : प्रा वंदना बोकील कुलकर्णी | प्रा.डॉ. वर्षा फाटक<br>प्रा. स्नेहलता पुजारी<br>(हिंदी विभाग प्रमुख) वक्त्यांची ने-आण प्रा प्रशांत नारगुडे |
| १६. | १३/०१/२०२५<br>सोमवार | स्वामी विवेकानंद विचार व कार्य<br>प्रा संदीप मुळे<br>व पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा | प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग)<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)<br>प्रा. सुनिल रत्नाकर सोनावणे<br>(राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख )<br>प्रा. स्वप्ना नितीन पूरोहित (इंग्रजी विभाग प्रमुख) |
| १७. | १५/०१/२०२५<br>बुधवार | स्थानिक साहित्यिकांशी गप्पा : साहित्याची निर्मितीप्रक्रिया | प्रा. स्वप्ना नितीन पूरोहित<br>(इंग्रजी विभाग प्रमुख)<br>श्री. सुभाष एस. मायंगडे (ग्रंथपाल)<br>प्रा. अजित जयराम जाधव (मराठी विभाग)<br>प्रा. सुनिल रत्नाकर सोनावणे<br>(राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख ) |

उप -प्राचार्य

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य



Nya. Tatyasaheb Athlye Art, Ved. S. R. Sapre Commerce & Vid. Dadasaheb Pitre Science College, Devrukh-415804 , Ratnagiri ( Maharashtra), India Ph. +91 2354 261058 website: http://aspcdevrukh.ac.in/


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3J9G+539, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.068286°
Long 73.625287°
01/01/25 12:21 PM GMT +05:30
Google

## उपक्रम -०१

| उपक्रमाचे नाव | वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाचे उद्घाटन व वाचन संस्कृती व पुस्तकांची निवड व्याख्यान – डॉ. अरविंद कुलकर्णी |
|---|---|
| तारीख व वार | ०१/०१/२०२५ ( बुधवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- १९५ शिक्षक- १७ |


"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांच्या हस्ते नववर्षाच्या प्रारंभी करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रारंभाप्रसंगी *"वाचन संस्कृती व पुस्तक निवड"* या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अरविंद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीचे महत्त्व आणि योग्य पुस्तक निवडीबाबत सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत डॉ. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागविण्याच्या महत्त्वाचे विविध पैलू समजावून सांगितले. त्याचप्रमाणे, पुस्तकांची योग्य निवड कशी करावी आणि त्या निवडीमुळे वाचनाचा अनुभव अधिक समृद्ध होऊ शकतो, याबद्दल मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी शुभेच्छापर भाषणात वाचनाच्या सवयीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, वाचनामुळे वैयक्तिक विकास साधता येतो आणि त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम होतो. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट त्यांच्या भाषणातून स्पष्ट झाले.

उप-प्राचार्य डॉ. सरदार पाटील यांनी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमाची उद्दिष्टे सांगितली आणि उपक्रमाच्या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.


या कार्यशाळेने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली आणि वाचनाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला.


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 09:45 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 09:34 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 10:09 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 09:34 AM GMT +05:30
Google


GPS Map Ca
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, Ind
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 10:10 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3j8f+q9g, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.066941° Long 73.623526°
01/01/25 09:34 AM GMT +05:30
Google

## उपक्रम -०२


| उपक्रमाचे नाव | ०१ तासाचे सामुहिक वाचन |
|---|---|
| तारीख व वार | ०१/०१/२०२५ ( बुधवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- १३५, शिक्षक- १९ |

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत १ तासाचे सामूहिक वाचन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन एकाच वेळी पुस्तक वाचन केले. सामूहिक वाचनामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली.

सामूहिक वाचनामुळे विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधण्याची आणि विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली. पुस्तकांचे वाचन एकत्रित केल्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची सुसंगतता आणि तीव्रता अनुभवता आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला वाचनाच्या महत्त्वाविषयी चर्चा करण्यात आली आणि त्यानंतर विद्यार्थ्यांना विविध साहित्यिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायक पुस्तकांमध्ये सामील करण्यात आले.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीला अधिक प्रोत्साहन देणारा ठरला आणि वाचनाचे महत्त्व त्यांनी अधिक ठळकपणे अनुभवले.


आठल्ये, सप्रे, पित्रे महाविद्यालय, देवरुख...
वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम
१ जाने, २०२५ ते १५ जाने, २०२५.
१ तासाचे सामूहिक वाचन उपक्रम
१ जानेवारी, २०२५.


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3J9G+539, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.068286°
Long 73.625287°
01/01/25 10:44 AM GMT +05:30
Google


Devrukh, Maharashtra, India
3J9G+539, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.068286°
Long 73.625287°
01/01/25 10:43 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Devrukh, Maharashtra, India
3J9G+539, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.068286°
Long 73.625287°
01/01/25 11:30 AM GMT +05:30
Google


Devrukh, Maharashtra, India
3J9G+539, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.068286°
Long 73.625287°
01/01/25 11:10 AM GMT +05:30
Google








## उपक्रम -०३

| उपक्रमाचे नाव | ग्रंथ व दिवाळी विशेषांक प्रदर्शन |
|---|---|
| तारीख व वार | ०२/०१/२०२५ ( गुरुवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- १४० शिक्षक- १५ |

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत आयोजित *ग्रंथ व दिवाळी विशेषांक प्रदर्शन* विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायक आणि ज्ञानवर्धक अनुभव ठरला. या प्रदर्शनात विविध नवीन आणि लोकप्रिय पुस्तके तसेच दिवाळीच्या विशेषांकांची आकर्षक मांडणी करण्यात आली. प्रदर्शित केलेली पुस्तके विविध शैक्षणिक, साहित्यिक, आणि प्रेरणादायक प्रकारांची होती, ज्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागली.

दिवाळी विशेषांकामध्ये दिवाळीच्या विशेष मुद्रित सामग्रीची मांडणी केली गेली होती, ज्यात विविध कथा, कविता, विशेष लेख आणि सांस्कृतिक विचारांची समावेश होता. या विशेषांकांमध्ये साहित्य आणि समाजातील विविध विषयांवर लेखन केले गेले होते.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनाला मिळालेल्या प्रतिसादाने वाचनाच्या महत्त्वाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये अधिक दृढ

केली आणि त्यांना वाचनासंबंधी उत्साही बनवले. यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या विविध प्रकारांशी परिचय होऊन, त्यांचे ज्ञानवर्धन आणि वाचन संस्कृतीला चालना मिळाली.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाचनाची आवड वाढवणे आणि विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे हा होता, जो यशस्वी झाला.


















## उपक्रम -०४

| उपक्रमाचे नाव | संगमेश्वर तालुका प्राथमिक शिक्षक संमेलन व ग्रंथालय भेट |
|---|---|
| तारीख व वार | ०२/०१/२०२५ ( गुरुवार ) |
| सहभागी संख्या | प्राथमिक शिक्षक- १९ |

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या उपक्रमांतर्गत संगमेश्वर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांना ग्रंथालयामध्ये मोफत प्रवेश (फ्री ॲक्सेस) देण्यात आला.

शिक्षकांनी ग्रंथालयातील विविध विभागांची सखोल पाहणी करत कपाटांमधील पुस्तके आवडीने चाळून पाहिली. त्यांनी काही दुर्मिळ व जुनी पुस्तके काळजीपूर्वक जतन केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. ग्रंथालयात आयोजित पुस्तक व दिवाळी विशेषांक प्रदर्शनाने शिक्षकांना विशेष आकर्षित केले.

प्रदर्शनास संस्थेचे उपाध्यक्ष मा. कृष्णकुमार भोसले यांनी देखील भेट दिली. त्यांनी प्रदर्शनाची मांडणी व उपक्रमांचे कौतुक करत ग्रंथालयाच्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. सुभाष मायंगडे यांनी उपस्थित शिक्षकांना ग्रंथालयातील विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची

आवड निर्माण करण्यासाठी तसेच वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी ग्रंथालय अनेक उपक्रम राबवत आहे.

महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर व उप-प्राचार्य डॉ. सरदार पाटील यांच्या प्रोत्साहनामुळे व मार्गदर्शनामुळे हे उपक्रम सातत्याने यशस्वी होत असून विद्यार्थ्यांना वाचनासाठी नवी प्रेरणा मिळत आहे.

शिक्षकांनी या उपक्रमांचे कौतुक करत, महाविद्यालयाच्या वाचनसंस्कृती वृद्धीसाठी चाललेल्या प्रयत्नांना शुभेच्छा दिल्या. अशा उपक्रमांमुळे वाचन संस्कृतीला नवा आयाम मिळत आहे आणि विद्यार्थ्यांसह शिक्षकांचाही वाचन अनुभव समृद्ध होत आहे.


















## उपक्रम -०५

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | ग्रंथालय भेट व परिचय – सद गुरू लोकमान्य वाचनालय, देवरुख |
| तारीख व वार | ०३/०१/२०२५ ( शुक्रवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- ३०, शिक्षक- ०४ |

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत विद्यार्थ्यांना सद्गुरू लोकमान्य वाचनालय, देवरुख याची एक विशेष भेट देण्यात आली. या भेटीद्वारे विद्यार्थ्यांना वाचनालयाची कार्यपद्धती, ग्रंथसंग्रह, आणि उपलब्ध संसाधनांची माहिती दिली गेली. सद्गुरू लोकमान्य वाचनालय देवरुखमधील एक प्रमुख शैक्षणिक व सांस्कृतिक केंद्र म्हणून ओळखले जाते. यामध्ये विविध क्षेत्रांतील समृद्ध पुस्तकांचा संग्रह आहे आणि ते स्थानिक समाजाच्या वाचन संस्कृतीला चालना देण्याचे कार्य करत आहे.

वाचनालयाचे परिचय करताना, वाचनालयाचे ग्रंथपाल सौ आमडेकर व सहकारी कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना त्यातील समृद्ध साहित्यसंग्रह, शैक्षणिक व शोधक ग्रंथ, तसेच वर्तमानपत्रे आणि जर्नल्स यांचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांना वाचनालयातील संसाधनांचा वापर शैक्षणिक आणि वैयक्तिक विकासासाठी कसा करावा, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

वाचनालयातील पुस्तकांचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे ज्ञानवर्धन कसे होईल आणि वाचनालयाचा उपयोग त्यांचे लेखन व संशोधन कसे सुधारू शकेल, हे स्पष्ट करण्यात आले.

सद्गुरू लोकमान्य वाचनालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजले आणि वाचनालयाच्या विविध सुविधांचा उपयोग कसा करावा, हे शिकवले. विद्यार्थ्यांनी वाचनालयातील पुस्तकांची निवड केली, विविध विषयांवर चर्चा केली आणि वाचनाची गोडी लागल्याची भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना वाचनालयाच्या महत्त्वाची जाणीव दिली आणि वाचन संस्कृतीला अधिक प्रोत्साहन मिळवण्याचा मार्ग स्पष्ट केला.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी सद्गुरू लोकमान्य वाचनालयातील आयोजित ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष, मा. सदानंदजी भागवत हे विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. त्यांच्याद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले गेले आणि योग्य मार्गदर्शन मिळवण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख विद्यार्थ्यांना करून देताना त्यांच्याशी संबंधित प्रेरणादायक विचारांवर चर्चा करण्यात आली. यावेळी त्यांचे योगदान आणि कार्य विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे होते.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना वाचनालयाचे महत्त्व आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे मार्ग स्पष्ट झाले.



Nya. Tatyasaheb Athlye Art, Ved. S. R. Sapre Commerce & Vid. Dadasaheb Pitre Science College, Devrukh-415804 , Ratnagiri ( Maharashtra), India Ph. +91 2354 261058 website: http://aspcdevrukh.ac.in/













## उपक्रम -०६

| उपक्रमाचे नाव | ग्रंथदिंडी |
|---|---|
| तारीख व वार | ०४/०१/२०२५ ( शनिवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- ८९ , शिक्षक- ०८ |




"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय ते सद्गुरू लोकमान्य सार्वजनिक वाचनालय असा प्रेरणादायी ग्रंथदिंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वाचनप्रसार, ज्ञानवृद्धी, वाचनाची आवड निर्माण करणे, आणि समाजामध्ये वाचन संस्कृती रुजवणे हा या ग्रंथदिंडीचा मुख्य उद्देश होता.

महाराष्ट्रातील संत साहित्याच्या परंपरेतून प्रेरणा घेऊन राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. दिंडीच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधान, भगवद्गीता, श्रीरामचरित मानस, आणि ज्ञानेश्वरी ग्रंथ यांचे पूजन करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थी आणि प्राध्यापक मोठ्या उत्साहाने या उपक्रमात सहभागी झाले होते. सद्गुरू लोकमान्य सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दिंडीचे पूजन करण्यात आले तसेच काही मौल्यवान ग्रंथ महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट स्वरूपात देण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सरदार पाटील, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. सुनील सोनावणे, ग्रंथपाल सुभाष मायंगडे, प्रा. अजित जाधव , मराठी विभाग प्रमुख डॉ. वर्षा फाटक, हिन्दी विभाग प्रमुख प्रा. स्नेहलता पुजारी, आणि प्रा. धनंजय दळवी यांनी विशेष पुढाकार घेतला. याशिवाय, ग्रंथालय सहाय्यक श्री. स्वप्निल कांगणे व श्री. रोशन गोरुले, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांनी "पुस्तक वाचा, जीवन घडवा" अशा वाचन प्रेरणादायी घोषवाक्यांचा जयघोष करत परिसरात वाचन संस्कृतीची चळवळ उभारली.

"वाचनाची रुजवात आणि ज्ञानाची मशाल प्रज्वलित करणाऱ्या या उपक्रमामुळे वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळाली आहे," अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.


















## उपक्रम -०७

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | लेखक आपल्या भेटीला अंतर्गत "नादिष्ट" कादंबरीचे लेखक श्री. मनोज बोरगावकर यांची मुलाखत |
| तारीख व वार | ०६/०१/२०२५ ( सोमवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- १६३ , शिक्षक- १३ |




'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत महाविद्यालयात एक महत्त्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये सध्याचे बेस्ट-सेलर लेखक प्रा. मनोज बोरगावकर यांनी त्यांच्या 'नदीष्ट' कादंबरीचा प्रवास विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. या कादंबरीत प्रा. बोरगावकर यांनी शहरीकरणामुळे आणि मानवाकडून निसर्गावर होणाऱ्या हानीकडे तळमळीने लक्ष वेधले आहे. त्यांनी साधारण माणसांतील असामान्यत्व व जाणीव विविध पात्रांमधून टिपली आहे, जे वाचनकर्त्यांसाठी एक नवीन दृषटिकोन उघडते.

कार्यक्रमात प्रा. मनोज बोरगावकर यांनी 'नदी वाहती राहिली पाहिजे तरच मानवी अस्तित्व टिकेल' हे उद्गार काढले, ज्याने उपस्थितांना जाणीव केली की निसर्ग वाचवणे म्हणजेच मानवतेचे अस्तित्व वाचवणे. लेखकाने आपला लेखनप्रवास देखील कथन केला, आणि त्याच्या कादंबरीच्या रचनात्मकतेवर आणि संदेशावर प्रकाश टाकला.

'नदीष्ट' कादंबरीला अल्पावधीतच अमाप लोकप्रियता मिळाली आहे. या कादंबरीचे २१ वे संस्करण प्रकाशित झाले आहे आणि हिंदी, कन्नड, गुजराथी व इंग्रजी भाषांमध्ये अनुवादित केली आहे. या कादंबरीला मानाचे पुरस्कारही प्राप्त झाले आहेत.

कार्यक्रमात महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वर्षा फाटक यांनी प्रा. बोरगावकर यांची मुलाखत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्नेहलता पुजारी यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. वर्षा फाटक यांनी अनुवादित केलेल्या 'पाश' या हिंदी कथासंग्रहाचे प्रकाशन प्रा. बोरगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला मान्यवरांच्या उपस्थितीने महत्त्व दिले, ज्यात संस्थाध्यक्ष सदानंद भागवत, कृष्णकुमार भोसले, शिरीष फाटक, माजी उपाध्यक्ष मदनजी मोडक, आणि प्रा. जी. के. जोशी यांचा समावेश होता. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच साहित्य प्रेमी नागरिक देखील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. सुभाष मायंगडे, वाचनालयाच्या ग्रंथपाल श्रद्धा आमडेकर, सहाय्यक स्वप्निल कांगणे, रोशन गोरुले आणि नरेंद्र खेडेकर यांचे विशेष योगदान लाभले.







GPS Map Ca
Devrukh
Google
Devrukh, Maharashtra, India
3J9F+2F4, Ozare Road, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.067912°
Long 73.623799°
06/01/25 09:28 AM GMT +05:30




"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम


GPS Map Camera
Devrukh
Google
Devrukh, Maharashtra, India
3J9F+2F4, Ozare Road, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.067912°
Long 73.623806°
06/01/25 09:24 AM GMT +05:30


"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रम


GPS Map Camera
Devrukh
Google
Devrukh, Maharashtra, India
3J9F+2F4, Ozare Road, Devrukh, Maharashtra 415804, India
Lat 17.06791°
Long 73.6238°
06/01/25 09:36 AM GMT +05:30

## उपक्रम -०८

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | ‘ज्ञान द्या, संधी द्या’ अंतर्गत गोकुळ अनाथाश्रम, मातृमंदिर देवरुख मुलींना ग्रंथ भेट व वाचन आवड संवाद |
| तारीख व वार | ०७/०१/२०२५ (मंगळवार ) |
| सहभागी संख्या | अनाथश्रम मुली- २६, विद्यार्थी- ०३ , शिक्षक- ०३ |












‘ज्ञान द्या, संधी द्या’ या उपक्रमाअंतर्गत देवरुख येथील गोकुळ अनाथाश्रम, मातृमंदिर या संस्थेतील २६ अनाथ मुलींना पुस्तके भेट देण्यात आली. महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी व प्राध्यापकानी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. या कार्यक्रमात मुलींशी वाचनाविषयक संवाद साधण्यात आला.

महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी त्यांना विविध साहित्यिक पुस्तकांची ओळख करून दिली आणि त्यावर आधारित संवाद साधला. या संवादाद्वारे मुलींना वाचनाची गोडी लागली तसेच वाचनाच्या महत्त्वाबद्दलची जागरूकता वाढवली.

या कार्यक्रमाद्वारे मुलींमध्ये वाचनाबद्दलची आवड निर्माण करण्यात आली आणि त्यांना त्यांच्या भविष्याबाबत अधिक सकारात्मक दृष्टिकोन प्राप्त झाला.

## उपक्रम -०९

| उपक्रमाचे नाव | ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत हातीव गावामध्ये ग्रंथ प्रदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट |
|---|---|
| तारीख व वार | ०८/०१/२०२५ (बुधवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी-८९, शिक्षक- ०५ |

‘पुस्तक आपल्या दारी’ या उपक्रमाअंतर्गत हातीव गावामध्ये एक विशेष ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये विविध प्रकारच्या साहित्यिक व शैक्षणिक ग्रंथांची सादरीकरणे करण्यात आली. यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट देण्यात आले, ज्यामुळे त्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांचे ज्ञानवर्धन होण्यास मदत झाली.

कार्यक्रमात एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमात महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे विद्यार्थीही सक्रियपणे सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी ग्रंथ प्रदर्शनात भेट दिलेल्या पुस्तकांबद्दल चर्चा केली आणि त्या पुस्तकांवर आधारित विचारांची देवाणघेवाण केली.

या उपक्रमाने गावातील विद्यार्थ्यांना वाचनाची महत्त्वाची संधी दिली. पुस्तकांचे प्रदर्शनी व वितरणाने त्यांना नवीन ज्ञान मिळवण्याची प्रेरणा दिली आणि त्यांच्या वैयक्तिक व बौद्धिक विकासाला चालना मिळाली.


















## उपक्रम -१०

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – पोलीस स्टेशन, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन |
| तारीख व वार | ०८/०१/२०२५ (बुधवार) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- ०८, शिक्षक- ०३ पोलिस अधिकारी व कर्मचारी -०५ |

‘पुस्तक आपल्या दारी’ या उपक्रमाअंतर्गत देवरुख पोलीस स्टेशनला पुस्तके वाचनासाठी दिली गेली. या उपक्रमाचा उद्देश पोलीस कर्मचार्यांना वाचनाची महत्त्वपूर्ण संधी देणे होता, ज्यामुळे त्यांना मानसिक विश्रांती मिळवता येईल आणि कामातील तणाव कमी होईल.

पोलीस दलातील कर्मचारी अनेक वेळा तणावग्रस्त परिस्थितीत काम करत असतात. अशा वेळी वाचनामुळे मानसिक शांतता मिळवता येते. वाचनाने त्यांचे मानसिक आरोग्य सुधारू शकते आणि त्यांना नवीन ज्ञान मिळवून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध होईल.

या उपक्रमाने पोलीस स्टेशनच्या कर्मचार्यांना वाचनाची गोडी लागली, त्यांना त्यांच्या दैनंदिन कामाच्या दृष्टीकोनातून विश्रांती मिळाली, तसेच मानसिक शांती मिळवण्याचा उत्तम मार्ग सापडला.






देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे,
न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य व
विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), देवरुख
वाचन संकल्प महाराष्ट्राचा
पंधरवडा
दि. ०१ जानेवारी - १५ जानेवारी
REDMI 13C 5G | VAJE1732
08/01/2025 11:00

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे
**न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, देवरुख, (स्वायत्त) ,जिल्हा- रत्नागिरी-४१५ ८०४**
नॅक पुंनर्मुल्यांकन ३ रे – 'अ' श्रेणी
मुंबई विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार- २००९- २०१०

**ASP /LIB/2024-25/ 12** दिनांक: ०८ जानेवारी २०२५

प्रति,
मा. पोलीस अधीक्षक,
देवरुख पोलीस ठाणे

**विषय: "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमाअंतर्गत ग्रंथालयातील पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे..

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने दिनांक **०१ ते १५ जानेवारी २०२५** या कालावधीत **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** हा उपक्रम साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये वाचनाची गोडी वाढवणे तसेच वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे. याच अनुषंगाने आपल्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या दैनंदिन कार्याचा ताण कमी करण्यासाठी व नवीन प्रेरणा मिळवून देण्यासाठी आम्ही वाचनसंस्कृतीला चालना देण्याचा हा उपक्रम आयोजित केला आहे.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून निवडक पुस्तके आपण व आपल्या सहकाऱ्यांसाठी आठवड्याभरासाठी वाचनासाठी उपलब्ध करून दिली जात आहेत. आपण ही पुस्तके वाचून आपल्या प्रतिक्रिया आणि अभिप्राय महाविद्यालयाच्या ग्रंथालयास कळवावेत. आठवड्यानंतर महाविद्यालयाचे प्रतिनिधी ही पुस्तके परत घेऊन पुस्तक परीक्षणासंदर्भात चर्चा करतील.

भविष्यात आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथालय सेवा आपणास उपलब्ध करून देण्यास आम्हांस आनंद होईल.

आपण या **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमामध्ये सहभागी होऊन वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिल्याबद्दल आम्ही आपले मनःपूर्वक आभार व्यक्त करतो.

| दाखल क्रमांक | पुस्तकाचे नाव | पुस्तकाचा लेखक | दिल्याची तारीख | पुस्तक परत करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| BC3276 | मॅडम कमिशनर: भारतीय पोलिस प्रमुखाची विलक्षण जीवनकहाणी | बोरवणकर, मीरां चढा | ०८/०१/२०२५ | १६/०१/२०२५ |
| 38561 | मन में है विश्वास | पाटील, विश्वास नांगरे | ०८/०१/२०२५ | १६/०१/२०२५ |
| 40755 | इकिगाई: दीर्घायुषी, निरोगी आणि आनंदी जीवनाचे जपानी रहस्य | गार्सिया, हेक्टर, मिरेलस, फ्रान्सिस, अनुवाद- ढापरे, प्रसाद | ०८/०१/२०२५ | १६/०१/२०२५ |
| 42401 | फाइट फॉर द राइट: दत्तात्रय मंडलिक- IPS | वाघमारे, राम | ०८/०१/२०२५ | १६/०१/२०२५ |
| 38504 | आय डेअर | बेदी, किरण | ०८/०१/२०२५ | १६/०१/२०२५ |

पोलीस स्टेशन ऑफिसर
देवरुख पोलीस ठाणे

ATHALYE SAPRE & PITRE COLLEGE LIBRARY DEVRUKH

प्राचार्य
आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुख

## उपक्रम -११

| उपक्रमाचे नाव | ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – तहसीलदार कार्यालय, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन |
|---|---|
| तारीख व वार | ०९/०१/२०२५ (गुरुवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- ०४, शिक्षक- ०२, शासकीय पदाधिकारी- |

‘पुस्तक आपल्या दारी’ या उपक्रमाअंतर्गत तहसीलदार कार्यालय, देवरुख यांना पुस्तके वाचनासाठी दिली गेली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश प्रशासनिक कर्मचाऱ्यांना वाचनाची महत्त्वपूर्ण संधी देणे होता, ज्यामुळे त्यांना मानसिक विश्रांती मिळवता येईल आणि कामातील तणाव कमी होईल.

वाचनाचा अभ्यास, ज्ञानवृद्धी, आणि मानसिक शांती साधण्यास मदत करतो. रोजच्या कामातील ताणतणावाला थोडे कमी करण्यासाठी वाचन एक उत्तम उपाय आहे. हे पुस्तक वाचन कर्मचार्यांना विचारांची खुलासणी करण्यास, नवे ज्ञान मिळवण्यासाठी आणि मानसिकदृष्ट्या प्रसन्न राहण्यासाठी प्रोत्साहन देईल.

या उपक्रमामुळे तहसीलदार कार्यालयाच्या कर्मचार्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांनी वाचनाच्या सवयीला जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनवले.

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे
न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे
विज्ञान महाविद्यालय, देवरुख, (स्वायत्त) ,जिल्हा- रत्नागिरी-४१५ ८०४
नॅक पुंनर्मुल्यांकन ३ रे – 'अ' श्रेणी
मुंबई विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार- २००९- २०१०

ASP /LIB/2024-25/13 दिनांक: ०९ जानेवारी २०२५

प्रति,
मा. तहसीलदार,
देवरुख तहसील कार्यालय

**विषय: "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमाअंतर्गत ग्रंथालयातील पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे..

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने दिनांक **०१ ते १५ जानेवारी २०२५** या कालावधीत **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** हा उपक्रम साजरा केला जात आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाचनसंस्कृतीला चालना देणे व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा आहे. याच पार्श्वभूमीवर, आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या रोजच्या कामाच्या ताणातून मुक्ती मिळवून वाचनाचा आनंद मिळावा, हा हेतू ठेवून आम्ही महाविद्यालयाच्या वतीने हा उपक्रम राबवत आहोत.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील काही निवडक पुस्तके आठवड्याभरासाठी आपण व आपल्या सहकाऱ्यांसाठी वाचनासाठी उपलब्ध करून दिली जात आहेत. आपण ही पुस्तके वाचून त्यावर आपले अभिप्राय व प्रतिक्रिया महाविद्यालयाच्या ग्रंथालयास कळवाव्यात. आठवड्यानंतर महाविद्यालयाचे प्रतिनिधी ही पुस्तके परत घेऊन त्यासंबंधित पुस्तक परीक्षण चर्चा करतील.

भविष्यात आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथालय सेवा आपणास उपलब्ध करून देण्यास आम्हांस आनंद होईल.

आपण या **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमामध्ये सहभागी होऊन वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिल्याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

| दाखल क्रमांक | पुस्तकाचे नाव | पुस्तकाचा लेखक | पुस्तक दिल्याची तारीख | पुस्तक परत करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 43012 | आजचा दिवस माझा | कुलांगे, विजय अमृता | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 37257 | ताई मी कलेक्टर व्हयनू: शून्यातून विशाल अवकाशाकडे झेपावणारा संघर्षमय प्रवास | पाटील, राजेश | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 39604 | नाना, मी साहयब झालो | औटी, विष्णू | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| D00900 | शिवाजी: द मॅनेजमेंट गुरु | जाधव, नामदेवराव | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 38564 | असे घडवा तुमचे भविष्य | कलाम, ए.पी.जे. अब्दुल; अनुवाद: अंबिके, मनोज | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |

९.१.२५

ATHALYE SAPRE & PITRE COLLEGE LIBRARY DEVRUKH

प्राचार्य
आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुख













## उपक्रम -१२

| उपक्रमाचे नाव | 'पुस्तक आपल्या दारी' अंतर्गत प्रशासकीय आस्थापना – नगरपंचायत कार्यालय, देवरुख यांस पुस्तके वाचनास देऊन प्रोत्साहन |
|---|---|
| तारीख व वार | ०९/०१/२०२५ (गुरुवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- ०४, शिक्षक- ०२, शासकीय पदाधिकारी- ०५ |

'पुस्तक आपल्या दारी' या उपक्रमाअंतर्गत नगरपंचायत कार्यालय, देवरुख यांना पुस्तके वाचनासाठी दिली गेली. या उपक्रमाचा उद्देश कामाच्या दबावातून तनाव कमी करण्यासाठी

वाचनाचा महत्त्व सांगणे होता. नेहमीच्या कामातील तणाव आणि मानसिक थकवा दूर करण्यासाठी वाचनाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

वाचनाने तणाव कमी होण्यास मदत होते आणि मानसिक शांती मिळवण्याचे साधन ठरते. यामुळे कर्मचार्यांना त्यांच्या दैनंदिन कामातून थोडा वेळ काढून विश्रांती मिळवता येईल आणि त्यांचे मानसिक स्वास्थ्य सुधारू शकेल.

या उपक्रमाने नगरपंचायत कार्यालयाच्या कर्मचार्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांना अधिक सकारात्मक दृष्टीकोन प्राप्त झाला. वाचनाच्या या सवयीमुळे त्यांचे काम करण्याची क्षमता वाढली आणि ते अधिक मानसिक शांती आणि आनंदी झाले.

देवरुख शिक्षण प्रसारक मंडळाचे

**न्या. तात्यासाहेब आठल्ये कला, वेद. शं. रा. सप्रे वाणिज्य, विधिज्ञ दादासाहेब पित्रे विज्ञान महाविद्यालय, देवरुख, (स्वायत्त) ,जिल्हा- रत्नागिरी-४१५ ८०४**

नॅक पुंनर्मुल्यांकन ३ रे – 'अ' श्रेणी

मुंबई विद्यापीठ उत्कृष्ठ महाविद्यालय पुरस्कार- २००९- २०१०

**ASP /LIB/2024-25/ 14** **दिनांक: ०९ जानेवारी २०२५**

प्रति,
मा. मुख्याधिकारी
देवरुख नगरपंचायत, देवरुख

**विषय: "वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमाअंतर्गत ग्रंथालयातील पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे..

**महोदय,**

महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने दिनांक **०१ ते १५ जानेवारी २०२५** या कालावधीत **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** हा उपक्रम साजरा केला जात आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाचनसंस्कृतीला चालना देणे व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा आहे. याच पार्श्वभूमीवर, आपल्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या रोजच्या कामाच्या ताणातून मुक्ती मिळवून वाचनाचा आनंद मिळावा, हा हेतू ठेवून आम्ही महाविद्यालयाच्या वतीने हा उपक्रम राबवत आहोत.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील काही निवडक पुस्तके आठवड्याभरासाठी आपण व आपल्या सहकाऱ्यांसाठी वाचनासाठी उपलब्ध करून दिली जात आहेत. आपण ही पुस्तके वाचून त्यावर आपले अभिप्राय व प्रतिक्रिया महाविद्यालयाच्या ग्रंथालयास कळवाव्यात. आठवड्यानंतर महाविद्यालयाचे प्रतिनिधी ही पुस्तके परत घेऊन त्यासंबंधित पुस्तक परीक्षण चर्चा करतील.

भविष्यात आपल्या ज्ञानाच्या कक्षा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी महाविद्यालयातील ग्रंथालय सेवा आपणास उपलब्ध करून देण्यास आम्हांस आनंद होईल.

आपण या **"वाचन संकल्प महाराष्ट्राचा"** उपक्रमामध्ये सहभागी होऊन वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन दिल्याबद्दल आम्ही आपले मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

| दाखल क्रमांक | पुस्तकाचे नाव | पुस्तकाचा लेखक | पुस्तक दिल्याची तारीख | पुस्तक परत करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| BC3282 | गोष्टी माणसांच्या | मूर्ती, सुधा | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 40193 | मी वनवासी | सपकाळ, सिंधुताई | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 29590 | माणस जोडावी कशी! | गोर्ले,शिवराज | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 35815 | चाणक्य नीती | मनोज, आवळे | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |
| 30786 | नेतृत्वाचे शहाणपण | शर्मा, रॉबिन | ०९/०१/२०२५ | १७/०१/२०२५ |

पोच ९.१.२०

लिपिक
नगर पंचायत देवरुख
जि. रत्नागिरी

ATHALYE SAPRE & PITRE COLLEGE LIBRARY DEVRUKH

प्राचार्य
आठल्ये-सप्रे-पित्रे स्वायत्त महाविद्यालय, देवरुख







आझादी का अमृत महोत्सव

देवरुख नगरपंचायत

# देवरूख नगरपंचायत,देवरुख

जि.रत्नागिरी फोन नंबर-02354-260146,260157 टोल फ्री क्रमांक-18002330157

पिन कोड-415804 इमेल आयडी npdevrukh@gmail.com

जा.क्र./नपंदे/१६९८/२०२४-२५ दि. २२/०१/२०२५

ASP COLLEGE DEVRUKH
Inward No. 759/2024-25
File No.
Date 23/01/2025

प्रति,
मा.प्राचार्य,
आठल्ये-सप्रे-पित्रे- स्वायत्त महाविद्यालय, देवरुख.

विषय: "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" उपक्रमाअंतर्गत ग्रंथालयातील पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे व वाचनसंस्कृतीला प्रोत्साहन देणे.

संदर्भ :दिनांक ०९/०१/२०२५ रोजीचे आपल्याकडील पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने दिनांक ०१ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम साजरा केला जात आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश वाचनसंस्कृतीला चालना देणे व नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे हा आहे. याच पार्श्वभूमीवर, कार्यालयातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या रोजच्या कामाच्या ताणातून मुक्ती मिळवून वाचनाचा आनंद मिळावा, हा हेतू ठेवून महाविद्यालयाच्या वतीने हा उपक्रम राबवला होता.

महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील काही निवडक पुस्तके आठवड्याभरासाठी देवरुख नगरपंचाय कार्यालय मध्ये वाचनासाठी उपलब्ध करून दिली .ग्रंथ हेच गुरु आणि वाचाल तर वाचाल या सुभाषिताना अनुसरून सदर पुस्तकांमुल्ये नप कर्मचारी यांना दैनंदिन ताणतणावतून थोडासा विरंगगुळा आणि ज्ञानत नक्कीच भर पडली आहे तसेच ग्रंत संपदा कर्मचारी यांच्या भविष्यासाठी उत्तम मार्गदर्शन राहील.

"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा स्तुत्य उपक्रम असून कायम यापुढे राबवण्यात यावा. याकमी देवरुख नगरपंचायतचे सहकार्य कायम राहील.

मुख्याधिकारी
देवरुख नगरपंचायत देवरुख

## उपक्रम -१३

| उपक्रमाचे नाव | ‘पुस्तक आपल्या दारी’ अंतर्गत पाटगाव गावामध्ये ग्रंथ प्रदर्शन व शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रंथ भेट |
|---|---|
| तारीख व वार | ०९/०१/२०२५ (गुरुवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी -५७ शिक्षक- ०५ |

‘पुस्तक आपल्या दारी’ या उपक्रमाअंतर्गत पाटगाव गावामध्ये एक विशेष ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये बाल साहित्य, साहित्यिक व शैक्षणिक ग्रंथांची सादरीकरणे करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांना विविध पुस्तकांची भेट देण्यात आली, ज्यामुळे त्यांना वाचनाची गोडी लागली आणि त्यांचे ज्ञानवर्धन झाले.

या उपक्रमात एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे विद्यार्थीही यामध्ये सक्रियपणे सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात उपलब्ध असलेल्या पुस्तकांवर चर्चा केली आणि त्या पुस्तकांवरील विचारांची देवाणघेवाण केली.

या उपक्रमाने गावातील विद्यार्थ्यांना वाचनाची महत्त्वाची संधी दिली. पुस्तकांचे प्रदर्शनी व वितरणामुळे त्यांना नवीन ज्ञान मिळवण्याची प्रेरणा मिळाली आणि त्यांच्या बौद्धिक व वैयक्तिक विकासाला चालना मिळाली.











## उपक्रम -१४

| | |
|---|---|
| **उपक्रमाचे नाव** | **व्याख्यान : कोकणचे बुद्धिवैभव – श्री. प्रकाश देशपांडे, लो. टिळक स्मारक वाचन मंदिर, चिपळूण** |
| **तारीख व वार** | **१०/०१/२०२५ (शुक्रवार )** |
| **सहभागी संख्या** | **विद्यार्थी- १३८ शिक्षक- ०९** |




'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' अंतर्गत आयोजित कार्यक्रमात चिपळूण येथील लोकमान्य टिळक स्मारकाचे अध्यक्ष श्री. प्रकाशजी देशपांडे यांनी कोकणात जन्मलेल्या आणि राष्ट्रीय पातळीवर अलौकिक कार्य केलेल्या लोकोत्तर व्यक्तित्वांची ओळख आपल्या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना करून दिली. बाजीराव पेशव्यांपासून झाशीची राणी, लोकमान्य टिळक, लोकसभेचे सभापती दादासाहेब मावळंकर, विष्णुबुवा ब्रह्मचारी, सर्वात पहिले शैलचित्रे शोधणारे हरिभाऊ वाकणकर, पहिले वृत्तपत्रकार बाळशास्त्री जांभेकर, समतानंद गद्रे, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, गोळवलकर गुरुजी, सार्वजनिक काका, कोकणचे गांधी आप्पासाहेब पटवर्धन, भागोजीशेठ किर, हमीद दलवाई, पिनकोड द्वारे देशातल्या प्रत्येक गावाला ओळख देणाऱ्या श्री. वेलणकर यांच्यापर्यंत अनेक रथी महारथीची, त्यांच्या उत्तुंग कार्याची ओळख ओघवत्या शैलीत करून दिली. कोकणच्या या बुद्धिवैभवातून विद्यार्थ्यांनी स्फूर्ती घ्यावी.' असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी कोकणातील या लोकनेत्यांचे कार्य अत्यंत स्फूर्तिदायी आहे. या व्यक्तिमत्वांच्या कार्याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी समाज व राष्ट्रोपयोगी कार्य करावे असा संदेश याप्रसंगी दिला.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आणि कोकणातील विविध महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वांच्या कार्यांबद्दल जागरूकता वाढवली.







## उपक्रम -१५

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | कार्यशाळा: संवाद कौशल्य कार्यशाळा डॉ. वंदना बोकिल-कुलकर्णी |
| तारीख व वार | ११/०१/२०२५ (शनिवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- १५३ शिक्षक – १० |




"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" या अभियानांतर्गत महाविद्यालयात एक दिवसीय संवाद कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्राध्यापक, लेखक, समीक्षक व उत्तम अभिवाचक म्हणून प्रसिद्ध असलेल्या डॉ वंदना बोकील-कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वाचन, लेखन व संभाषण कौशल्यांबाबत मार्गदर्शन केले. या कलांमध्ये कौशल्य प्राप्त केल्यास करियरच्या विविध संधी कशा प्राप्त होतात याची अनेक उदाहरणे दिली. मातृभाषेची सशक्त परंपरा पुढे न्यायची असेल, तर ती सजगतेने वापरणे आवश्यक आहे. प्रत्येक दशकातील साहित्यकृतींची भाषा, नवनवीन चळवळी व प्रवाह यांनी सकस होत जाणाऱ्या साहित्यकृती

वाचल्या पाहिजेत. तरच आपली भाषा समृद्ध होते, आपले लेखन सकस होते असे प्रतिपादन त्यांनी केले.


प्राचार्य डॉ. नरेंद्र तेंडोलकर यांनी आपल्या मनोगतातून वाचन, लेखन, संभाषण कला उत्तम रीतीने संपादन केल्यास व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास मदत होते, तेव्हा अशा कार्यशाळांचा विद्यार्थ्यांनी स्वविकासासाठी उपयोग करून घ्यावा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

या कार्यशाळेने विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरित केले, तसेच संवाद कौशल्य आणि लेखनाच्या महत्त्वाबद्दल जागरूक केले.


















## उपक्रम -१६

| | |
|---|---|
| उपक्रमाचे नाव | पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा |
| तारीख व वार | १३/०१/२०२५ (सोमवार ) |
| सहभागी संख्या | विद्यार्थी- 75 शिक्षक- ५ |



महाविद्यालयात आयोजित केलेल्या पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि विविध पुस्तकांचे प्रभावी सादरीकरण केले. स्पर्धेत *मृत्युंजय*, *डायरी ऑफ ॲना फ्रँक*, *ती फुलराणी*, *शिवराय*, आणि *सलाम मृत्युंजयांना* यांसारख्या साहित्यिक पुस्तकांची निवड करण्यात आली.

प्रत्येक विद्यार्थ्याने निवडलेल्या पुस्तकाचा सारांश, त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा, घटनाक्रम, आणि पुस्तकाने दिलेला संदेश प्रभावी व प्रेरणादायी पद्धतीने मांडला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून वाचनाविषयीची गोडी आणि पुस्तकांविषयीची सखोल समज प्रकर्षाने जाणवली.

